a. GIS (Group Insu. Schemes) for non-teaching staff (in file - 6.3.1a)

# मुंबई विद्यापीठ

इएसटी/आयसीसी /२०१३-१४/ 15 /२०१३.
मुंबई–४०० ०३२,
८ ऑगस्ट, २०१३.

परिपत्रक :–

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल, प्रभारी परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठ प्रशासनाने सर्व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचा–यांना **"वैद्यकीय गट विमा योजना"** (Group Health Insurance) सुरू करण्याचे ठरविले आहे. सदर योजना राबवित असताना विमा कंपन्यांना प्रत्येक कर्मचा–याची व त्याच्या कुटुंबियांची आवश्यक माहिती देणे अत्यंत जरूरीचे आहे. सोबत जोडलेल्या जोडपत्रामधील **विहित तक्त्यामध्ये सदरची माहिती भरुन दिनांक १७ ऑगस्ट, २०१३ पर्यंत उपकुलसचिव, आस्थापना विभाग–२(४), कक्ष क्रमांक २१३ मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई–४०००३२, येथे जमा करावी, जेणेकरून पुढील कार्यवाही तातडीने करणे सोईचे होईल.** सदर बाब संबंधित कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून दयावी.

(सही)
कुलसचिवांकरीता

मुंबई – ४०० ०३२.
८ ऑगस्ट, २०१३.

प्रति,
विद्यापीठातील विभागाचे संचालक/विभाग प्रमुख,
सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य,
विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल, प्रभारी परीक्षा नियंत्रक,
वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामग्री,
विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि
कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख.

आस्था.२(४)/ 15(A)/२०१३ — ८ ऑगस्ट, २०१३.

**(अ) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:–**

१. संचालक, जमनालाल बजाज शिक्षण संस्था,
२. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,
३. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग,
४. संचालक, शारिरीक शिक्षण आणि क्रिडा,
५. संचालक, प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार विभाग,
६. प्राध्यापक–नि–संचालक, दूर शिक्षण संस्था,
७. संचालक, अॅकॅडेमिक स्टाफ कॉलेज,
८. संचालक, गरवारे व्यवसाय शिक्षण व विकास संस्था,
९. संचालक, बहि:शाल शिक्षण मंडळ,
१०. संचालक, संगणक केंद्र, परीक्षा भवन,
११. संचालक, अल्केश दिनेश मोदी अर्थशास्त्र व व्यवस्थापन अभ्यास संस्था,
१२. संचालक, प्रशासकीय प्रगती अकादमी, विद्यानगरी,
१३. संचालक, रंगभूमी कला विभाग, विद्यानगरी,
१४. ग्रंथपाल, विद्यापीठ ग्रंथालय,
१५. प्राध्यापक, गुरुदेव टागोर तौलनिक साहित्य अध्यासन,
१६. पीठासन अधिकारी, मुंबई विद्यापीठ व विद्यापीठ महाविद्यालय लवाद न्यायाधिकरण

# मुंबई विद्यापीठ

य गट विमा योजनेकरिता कर्मचा-यांनी दयावयाची आवश्यक माहिती खालील रकान्यात भरून दि. १७ ऑगस्ट, २०१३ पर्यंत आस्थापना विभागात (कक्ष कमांक २१३) येथे पाठविण्यात यावी

सेवा पुस्तक क्रमांक ः ------------------

| री<br>क्र. | कर्मचा-याचे नाव | पदनाम | विभाग | जन्म दिनांक | नियुक्ती दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | रक्तगट (Blood Group) | दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

ा-याच्या कुटुंबियांची माहिती ः

| ांक | (स्वतः,पत्नी/पती, २ मुले व आई-वडील/सासु–सासरे ) | कर्मचा-याशी नाते | स्त्री/पुरूष | जन्म दिनांक | वय वर्षे | रक्तगट (Blood Group) | वास्तव्याचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| ५ | | | | | | | |
| ६ | | | | | | | |

ची व्याख्या :  *पुरूष कर्मचारी : स्वतः+ पत्नी + २ मुले आणि आई–वडील = एकूण ६/महिला कर्मचारी : स्वतः+ पती + २ मुले + सासु–सासरे = एकूण ६

## हमीपत्र

उपकुलसचिव,
विद्यापीठ.

य,

परीपत्रक क्र. इएसटी/आयसीडी/२०१३–१४/ /२०१३, दिनांक ऑगस्ट,२०१३ अन्वये मी कु./श्री/श्रीमती ........................................................ या पत्राद्वारे अशी देते की, मुंबई विद्यापीठामार्फत लागु होणा–या वैद्यकीय विमा योजनेत (Group Health Inshurance) स्वेच्छेने सहभागी होऊ इच्छितो/इच्छिते. मला मिळणा–या वार्षिक वैद्यकीय भत्ता व ुकनीऐवजी मी वरील योजना स्विकारीत आहे.

उपकुलसचिव
आस्थापना विभाग (

कर्मचा-याची स्वाक्षरी :- -----------------------------------

संपुर्ण नाव :- -----------------------------------

RS
२६/५/१५

स्मरणपत्र :– १

## मुंबई विद्यापीठ

**EST/ICC/2014-15/6 of 2014**

**परिपत्रक :–**

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, यांनी या विभागाचे परिपत्रक क्र. **EST/ICC/2014-15/ 2 of 2014** दिनांक ७ मे, २०१४ चे अवलोकन करावे. सदर परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे मुंबई विद्यापीठ प्रशासनाने सर्व शिक्षकेतर अधिकारी/कर्मचा–यांना दरवर्षी मिळणा–या वैद्यकीय भत्त्याऐवजी **"वैद्यकीय गट विमा योजना"** (Group Health Insurance Policy) सुरू करण्याचे योजिले आहे. सदर योजना कार्यान्वित करण्याठी विविध विमा कंपन्यांना प्रत्येक शिक्षकेतर अधिकारी/कर्मचा–यांची व त्यांच्या कुटुंबियांची सविस्तर माहिती देणे अत्यंत आवश्यक आहे. सदर माहिती उपरोक्त परिपत्रकात दर्शविलेल्या तक्त्याच्या स्वरूपात **estab.universityofmumbai@gmail.com** या मेलवर परिपत्रक निर्गमित झालेल्या तारखेपासून १० दिवसांत प्रथम प्राधान्य तत्वावर सादर करण्याचे अपेक्षित होते. तथापि सदर परिपत्रकातील आदेशाचे अनुपालन झालेले दिसून येत नाही.

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, प्रभारी नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख, यांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त माहिती अतितात्काळ उपरनिर्देशित मेलवर सादर करावी.

२२/५/१४
कुलसचिव

मुंबई–४०००३२.

२६ मे, २०१४.

**प्रति,**

विद्यापीठातील विभागाचे संचालक/विभाग प्रमुख,
सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य,
विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल,
परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी,
सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामग्री,
विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि
कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख.

४. संचालक, आजिवन शिक्षण आणि विस्तार विभाग,
५. प्राध्यापक—नि—संचालक, दूर व मुक्त शिक्षण संस्था,
६. संचालक, अॅकॅडेमिक स्टाफ कॉलेज,
७. प्रभारी संचालक, गरवारे व्यवसाय शिक्षण व विकास संस्था.
८. संचालक, बहि:शाल शिक्षण मंडळ,
९. संचालक, संगणक केंद्र, परीक्षा भवन,
१०. संचालक, अल्केश दिनेश मोदी अर्थशास्त्र व व्यवस्थापन अभ्यास संस्था,
११. संचालक, प्रशासकीय प्रगती अकादमी, विद्यानगरी,
१२. प्राध्यापक, गुरुदेव टागोर तौलनिक साहित्य अध्यासन,
१३. पीठासीन अधिकारी, मुंबई विद्यापीठ व विद्यापीठ महाविद्यालय लवाद न्यायाधिकरण,
१४. मानद विधी सल्लागार,
१५. उप—प्रादेशिक सेवायोजन अधिकारी, विद्यापीठ सेवायोजन आणि मार्गदर्शन केंद्र,
१६. मानद समन्वयक, विद्यापीठ संगणीकरण केंद्र,
१७. प्रभारी मानद कार्यात्मक समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना,
१८. समन्वयक, विद्यापीठ उपकेंद्र, रत्नागिरी,
१९. मानद सल्लागार, विद्यापीठ उपकेंद्र, बाळकुम, ठाणे,
२०. समन्वयक, डॉ. आंबेडकर सामाजिक न्याय केंद्र,
२१. अध्यक्षा, महिला विकास कक्ष,
२२. वसतिगृह अधीक्षक, विद्यापीठ वसतिगृहे (सर्व),

**(ब) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:—**

१. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव,
२. उपकुलसचिव/मुख्य लेखापाल (वित्त व लेखा),
३. नियंत्रक, मुद्रण व लेखनसामुग्री, विद्यापीठ मुद्रणालय
४. विद्यापीठ अभियंते (फोर्ट परिसर व विद्यानगरी परिसर),
५. सर्व सहायक कुलसचिव/सहायक कुलसचिव (वित्त व लेखा)
६. सुरक्षा अधिकारी,
७. सर्व सहायक सुरक्षा अधिकारी
८. कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख,
९. उद्यान अधीक्षक/अधिक्षक (तांत्रिक), विधी विभाग,
१०. स्वीय सहायक (१) कुलगुरू (२) प्र. कुलगुरू (३) कुलसचिव,
(४) संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,
(५) परीक्षा नियंत्रक, (६) वित्त व लेखा अधिकारी.

**(क) प्रत माहितीसाठी अग्रेषित:—**

१. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ अधिकारी संघटना,
२. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ,
३. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ आणि महाविद्यालय शिक्षक संघटना,
४. सरचिटणीस, एज्युकेशनल एम्पलॉई ज वेल्फेअर असोशिएशन,
अभिलेखा विभाग — २० प्रती.
५. सरचिटणीस, अशासकीय महाविद्यालय संघटना, (A.N.G.C.) विद्यापीठ विद्यार्थी भवन,चर्चगेट, मुंबई—४०००२०.

कुलसचिव

# मुंबई विद्यापीठ

**क्र.आस्था २ (४)/इएसटी/आयसीसी/२०१६–१७/८**

परिपत्रक:–

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक, विभागप्रमुख, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, स्थानापन्न परिक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे / कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठ प्रशासनाने सर्व शिक्षकेत्तर अधिकारी कर्मचा–यांना वैद्यकिय गट विमा योजना (Group Health Insurance Policy) सन २०१४–२०१५ पासून कार्यान्वित केलेली आहे. वित्तीय वर्ष २०१६ –२०१७ करिता संबंधित विमा कंपनीने मागणी केलेली विम्याची रक्कम अवाजवी असल्याचे निदर्शनास आल्यामुळे प्रशासनाने कंपनीशी वाटाघाटी करण्याकरिता माजी सिनेट सदस्य प्राचार्य डॉ. गडे व प्राचार्य डॉ. विजय जोशी यांची समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीची बैठक मान्यता प्राप्त कर्मचारी संघटनेबरोबर दिनांक १६ जुलै, २०१६ रोजी मा. कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली आणि त्यावर खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला व सदरचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने मान्य केलेला आहे:–

१. वित्तीय वर्ष २०१५–२०१६ करिता विमा कंपनीस विम्याच्या हप्त्यापोटी अदा केलेली रूपये ९४,००,०००/– ( रूपये चौ–यान्नव लाख ) ही कायम (Base) रक्कम निश्चित करून त्यावरिल अधिकची वार्षिक विम्याची रक्कम सर्व शिक्षकेत्तर कर्मचा–यांकडून माहे जुलै, २०१६ पासून कुलगुरू निधीमध्ये खालील दराप्रमाणे जमा करण्यात येईल. :–

| वर्ग | दरमहा कपात करावयाची रक्कम (रूपये) |
|---|---|
| 'अ' | ३००/– |
| 'ब' | २५०/– |
| 'क' | २००/– |
| 'ड' | १५०/– |

२. विद्यापीठात आस्थापनावर असलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकडून वरिलप्रमाणे दरमहा विमापोटी रक्कम जमा केल्यास रू. २९,१७,८००/– इतकी वार्षिक रक्कम जमा होईल. विद्यापीठ निधीतून देण्यात येणारी कायम रक्कम रू. ९४.०० लक्ष अधिक होईल. विद्यापीठ निधीतून देण्यात येणारी कायम रक्कम रू. ९४.०० लक्ष अधिक कर्मचाऱ्यांकडून जमा होणारी रू. २९.१७ लक्ष असे एकूण रू. १२३.१७ लक्ष जमा होणं अपेक्षित आहे. ही जमा होणारी रक्कम, व समितीव्दारे कंपनीशी होणाऱ्या वाटाघाटी मध्ये निश्चित होणारी रक्कम, यातील फरकाची रक्कम विद्यापीठ निधीवर अतिरिक्त भार देय होईल. तसेच पुढील वित्तिय वर्षामध्ये कर्मचाऱ्यांची वैद्यकीय दावे कमी अधिक झाल्यास वर नमूद केलेली कर्मचाऱ्यांची दरमहा वर्गणी सुद्धा कमी / अधिक होईल. कर्मचारी संघटनेला कर्मचाऱ्यांची कुलगुरू निधीतील दरमहा वर्गणी वाढविण्यात येत असल्याबाबत लेखी कळविण्यात आलेले आहे.

३. कर्मचाऱ्यांचे वैद्यकीय दावे वार्षिक हप्त्यापोटी देण्यात आलेल्या रक्कमेपेक्षा कमी झाल्यास पुढील वित्तिय वर्षामध्ये वार्षिक विमा हप्ता सुद्धा कमी झाला पाहिजे, अशी लेखी हमी कंपनीकडून घेण्यात आलेली आहे.

*विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक, विभागप्रमुख, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, स्थानापन्न परिक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख, यांनी सदर बाब संबंधित अधिकारी /कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावी.*

23/8/16
कुलसचिव

मुंबई–४०००३२.
२५ ऑगस्ट, २०१६.

cular Marathi swati

# मुंबई विद्यापीठ

क्र.आस्था २ (४)/इएसटी/आयसीसी/२०१७–१८/१३

परिपत्रक :–

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल, संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठ प्रशासनाने सर्व शिक्षकेत्तर अधिकारी/ कर्मचा–यांना वैद्यकीय गटविमा योजना (Group Health Insurance Policy) सन २०१४–१५ पासून कार्यान्वित केलेली आहे. वित्तीय वर्ष २०१७–१८ करिता सदर योजनेचे नुतणीकरण करण्यात आलेले आहे. परिपत्रक क्र.आस्था २(४)/इएसटी/आयसीसी/२०१७–१८/७, दिनांक ०९ ऑगस्ट, २०१७ अन्वये विद्यापीठातील ज्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी/ अधिका–यांनी वैयक्तिक होकार (संमती पत्र) लेखी स्वरूपात विहीत वेळेत सादर केले आहेत, अशा कर्मचा–यांच्या वेतनातून दरमहा प्रत्येकी रू. १५०/– (रूपये दीडशे फक्त) कपात करण्यात येईल.

विद्यापीठातील सर्व विभागाचे संचालक, विभागप्रमुख, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल, संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख, यांनी सदर बाब संबंधित अधिकारी/कर्मचा–यांच्या निदर्शनास आणावी.

कुलसचिव

क्र.आस्था(२/४)/इएसटी/आयसीसी/२०१७–१८/९३ २५ऑक्टोबर, २०१७

प्रति,

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख,
सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य,
विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल,
संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी,
सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री,
विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि
कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख

(अ) प्रत माहितीसाठी व योगय त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:—

१. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव,
२. उपकुलसचिव/मुख्य लेखापाल (वित्त व लेखा विभाग)
३. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ मुद्रणालय
४. विद्यापीठ अभियंते (फोर्ट परिसर व विद्यानगरी परिसर)
५. सर्व सहायक कुलसचिव/सहायक कुलसचिव (वित्त व लेखा)
६. सुरक्षा अधिकारी
७. सर्व सहायक सुरक्षा अधिकारी
८. कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख
९. उद्यान अधीक्षक/अधीक्षक (तांत्रिक), विधी विभाग
१०. स्वीय सहायक (१) प्रभारी कुलगुरु (२) प्रभारी प्र—कुलगुरू, (३) कुलसचिव,
(४) स्था. वित्त व लेखा अधिकारी,
(५) संचालक, शैक्षणिक व नियोजन विकास मंडळ

(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित:—

१. अध्यक्ष, मुंबई युनिवर्सिटी ऑफिसर्स वेल्फेअर असोसिएशन ( मुनोवा)
२. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ,
३. सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना.

कुलसचिव

# मुंबई विद्यापीठ

क्र.आस्था २ (४)/इएसटी/आयसीसी/२०१७–१८/७

**परिपत्रक :—**

**विद्यापीठातर्फे कार्यान्वित असलेल्या वैद्यकीय गटविमा योजना**

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, स्थानापन्न संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, स्थानापन्न वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना खालीलप्रमाणे कळविण्यात येते:—

१. आपणास विदीत आहेच की, विद्यापीठातील सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी २०१४–१५ सालापासून न्यू इंडिया ॲश्युरन्स कंपनीमार्फत वैद्यकीय गटविमा योजना कार्यान्वित करण्यात आली. आजवर (२०१६–१७ पर्यंत) या योजनेअंतर्गत लाभार्थी कर्मचारी संख्या व एकूण दावा केलेली रक्कम, इन्शुरन्स कंपनीला भरलेला प्रिमियम (कर धरून) आणि विद्यापीठाने प्रिमियमची दिलेली रक्कम याचा तक्ता खालीलप्रमाणे आहे :—

| वर्ष | इन्शुरन्स कंपनीचा प्रिमियम अधिक कर | विद्यापीठाने अदा केलेली रक्कम | कर्मचाऱ्यांच्या दाव्याची एकूण रक्कम | लाभ घेतलेले कर्मचारी |
|---|---|---|---|---|
| सन २०१४–१५ | रू.६०,१२,१५९/— | रू.६०,१२,१५९/— | रू.५४,०४,४०७/— | १२३ |
| सन २०१५–१६ | रू.९३,४७,०००/— | रू.९३,४७,०००/— | रू.१,६५,०३७३९/— | २०० |
| सन २०१६–१७ | रू.१,२५,००,०००/— | रू.९४,००,०००/— | रू.१,८९,००,०००/— | ३०० |
| सन २०१७–१८ | रू.१,५६,३५,०००/— (प्रस्तावित) | रू.१,०६,००,०००/— (प्रस्तावित) | —— | —— |

२. सन २०१७–१८ याकरिता (ऑगस्ट महिन्यातील ज्या दिवशी इन्शुरन्स कंपनी विद्यापीठातर्फे प्रिमियमची जी रक्कम अदा केली जाईल त्या दिवसापासून एक वर्ष पूर्ण होईपर्यंत) इन्शुरन्स कंपनीने रू.१,३२,५०,०००/— इतकी मूळ रक्कम अधिक १८ टक्के जीएसटी अशी एकूण रू.१,५६,३५,०००/— इतक्या रकमेची मागणी केली आहे. यातील १८ टक्के जीएसटीचा भार विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सोसावा लागू नये म्हणून गेल्या वर्षी विद्यापीठाने अदा केलेली एकूण रू.९४.०० लाख ही रक्कम (ज्यात कदापी वाढ होणार नाही या शर्तीच्या अधीन राहून) वाढवून त्यात १२ लाख रूपयांची भर घालून एकूण रू. १,०६,००,०००/— रूपये देऊ केलेले आहेत. उर्वरित रू.५०,३५,०००/— इतकी हप्त्याची रक्कम विद्यापीठातील एकूण १,२१६ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनातून दरमहा रूपये ३५०/— वजा करून उभी करावी असा प्रस्ताव मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघटनेच्यावतीने विद्यापीठ प्रशासनास देण्यात आला आहे.

तथापी, सदर बाब दिनांक ३० जुलै, २०१७ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने त्यांच्या शिफारशींसह जेव्हा व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ७ ऑगस्ट, २०१७ च्या बैठकीत ठेवण्यात आली, तेव्हा त्यानुसार असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठातील काही शिक्षकेत्तर कर्मचारी सदर मेडिक्लेम योजनेचा लाभ घेऊ इच्छित नाहीत त्यानुसार सद्यस्थितीत असलेल्या १२१६ कर्मचाऱ्यांची संख्या कमी होईल. म्हणून विमा हप्ता व त्यामधून विद्यापीठाने [illegible] उर्वरित रकमेमध्ये जी कर्मचाऱ्यांच्या वेतनातून प्रतिमहा कपात

३. या परिपत्रकाद्वारे सर्व शिक्षकेत्तर सहकाऱ्यांना असे कळविण्यात येत आहे की, ज्यांना उपरोक्त वैद्यकीय गटविमा योजना स्विकारावयाची असेल अशाच कर्मचाऱ्यांनी या परिपत्रकाबरोबर जोडलेले वैयक्तिक होकार (संमती पत्र) लेखी स्वरूपात दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ च्या संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत उपकुलसचिव, आस्थापना २ व ४, यांच्याकडे सादर करावे.

विद्यापीठातील सर्व विभागाचे संचालक, विभागप्रमुख, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, स्थानापन्न संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, स्थानापन्न वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख, यांनी सदर बाब संबंधित अधिकारी/कर्मचा—यांच्या निदर्शनास आणावी.

मुंबई—४०००३२
९ ऑगस्ट, २०१७

कुलसचिव

क्र.आस्था(२/४)/इएसटी/आयसीसी/२०१७—१८/७ ९ ऑगस्ट, २०१७

प्रति,

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख,
सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य,
विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल,
स्थानापन्न संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, स्थानापन्न वित्त व लेखा अधिकारी,
सर्व उपकुलसचिव, स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री,
विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि
कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख

(अ) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:—

१. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव,
२. उपकुलसचिव/मुख्य लेखापाल (वित्त व लेखा विभाग)
३. स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ मुद्रणालय
४. विद्यापीठ अभियंते (फोर्ट परिसर व विद्यानगरी परिसर)
५. सर्व सहायक कुलसचिव/सहायक कुलसचिव (वित्त व लेखा)
६. सुरक्षा अधिकारी
७. सर्व सहायक सुरक्षा अधिकारी
८. कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख
९. उद्यान अधीक्षक/अधीक्षक (तांत्रिक), विधी विभाग
१०. स्वीय सहायक (१) कुलगुरु (२) कुलसचिव, (३) स्थानापन्न संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, (४) स्थानापन्न वित्त व लेखा अधिकारी, (५) संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित:—

१. अध्यक्ष, मुंबई युनिवर्सिटी ऑफिसर्स वेल्फेअर असोसिएशन (मुनोवा)
२. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ,
३. सरचिटणीस, ...

# मुंबई विद्यापीठ

## संमतीपत्र

कर्मचाऱ्याचे नाव :—
पदनाम :—
विभागाचे नाव :—
कर्मचारी सांकेतांक क्र :—
दिनांक

प्रति,
उपकुलसचिव,
आस्थापना विभाग २ व ४
मुंबई विद्यापीठ,
फोर्ट,
मुंबई ४०० ०३२

महोदय,

मी, श्री/श्रीमती.................................परिपत्रक क्र.....................
दिनांक ................. च्या अनुषंगाने कळवू इच्छितो/ इच्छिते की, मुंबई विद्यापीठाने सुरू केलेली "वैद्यकिय गटविमा योजनेच्या" लाभाची मला व माझ्या कुटुंबियांना आवश्कता असून मी या योजनेचा लाभ घेण्यास इच्छूक आहे. तरी कृपया याची नोंद घ्यावी.

आपला/आपली विश्वासू

( )

मुंबई. ४०० ०३२

दिनांक

# मुंबई विद्यापीठ

अत्यंत महत्वाचे

क्र.आस्था २ (४)/इएसटी/आयसीसी/२०१७–१८/12/

परिपत्रक :—

विद्यापीठातर्फे कार्यान्वित असलेल्या वैद्यकीय गटविमा योजना

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल, संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, परिपत्रक क्र.आस्था २(४)/इएसटी/आयसीसी/२०१७–१८/७, दिनांक ०९ ऑगस्ट, २०१७ अन्वये विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मच्याऱ्यांना ज्यांना वैद्यकीय गटविमा योजना स्वीकारायची असेल अशाच कर्मचा–यांचा वैयक्तिक होकार (संमती पत्र) लेखी स्वरूपात सादर करण्यात याबेत असे अवगत करण्यात आले होते.

प्रशासनाच्या आदेशानुसार या परिपत्रकाद्वारे असे कळविण्यात येते की, गटविमा योजना हि कर्मचाऱ्यांच्या हितासाठी अत्यंत चांगली व कल्याणकारी योजना असल्यामुळे सदर योजना त्वरीत कार्यान्वीत होण्यासाठी ज्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय गटविमा योजना स्विकारावयाची नसेल अशाच कर्मचाऱ्यांनी या परिपत्रकाबरोबर जोडलेले वैयक्तिक नकारात्मक पत्र लेखी स्वरूपात दिनांक २० सप्टेबर, २०१७ च्या सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत परिपत्रक उपकुलसचिव, आस्थापना २ व ४, यांच्याकडे सादर करावे. जे कर्मचारी लेखी स्वरूपात नकार कळविणार नाहीत त्यांचा होकार असल्याचे समजण्यात येईल, याची कृपया याची नोंद घ्यावी.

विद्यापीठातील सर्व विभागाचे संचालक, विभागप्रमुख, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल, संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख, यांनी सदर बाब संबंधित अधिकारी/कर्मचा–यांच्या निदर्शनास आणावी.

कुलसचिव

मुंबई–४०००३२
१८ सप्टेंबर, २०१७

क्र.आस्था(२/४)/इएसटी/आयसीसी/२०१७-१८/12 १८ सप्टेंबर, २०१७

प्रति,

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख,
सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य,
विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल,
संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी,
सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री,
विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि
कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख

(अ) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव,
२. उपकुलसचिव/मुख्य लेखापाल (वित्त व लेखा विभाग)
३. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ मुद्रणालय
४. विद्यापीठ अभियंते (फोर्ट परिसर व विद्यानगरी परिसर)
५. सर्व सहायक कुलसचिव/सहायक कुलसचिव (वित्त व लेखा)
६. सुरक्षा अधिकारी
७. सर्व सहायक सुरक्षा अधिकारी
८. कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख
९. उद्यान अधीक्षक/अधीक्षक (तांत्रिक), विधी विभाग
१०. स्वीय सहायक (१) कुलगुरु (२) कुलसचिव, (३) संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, (४) वित्त व लेखा अधिकारी, (५) संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित:-

१. अध्यक्ष, मुंबई युनिवर्सिटी ऑफिसर्स वेल्फेअर असोसिएशन ( मुनोवा)
२. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ,
३. सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना.

कुलसचिव

# नकारपत्र

कर्मचाऱ्याचे नाव :—
पदनाम वि,भागाचे :—
नाव कर्मचारी :—
सांकेतांक क :—
सेवा पुस्तक क्र:—
दिनांक:—

प्रति,
कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ,
फोर्ट,
मुंबई ४०० ०३२

महोदय,

मी, श्री/श्रीमती..........................................परिपत्र क्र. इएसटी/आयसीडी/२०१७—१८/१२, दिनांक १८ सप्टेंबर,२०१७ च्या अनुषंगाने कळवू इच्छितो/ इच्छिते की, मुंबई विद्यापीठने सुरू केलेली “वैद्यकिय गटविमा योजनेच्या” लाभाची मला व माझ्या कुटुंबियांना आवश्कता नसून कृपया आपण ठरविलेली रक्कम माझ्या वेतनातून कापण्यात येवू नये. ही विनंती.

आपला/आपली विश्वासू

( )

मुंबई. ४०० ०३२

दिनांक

आस्थापना – २ व ४

क्र. इएसटी/आयसीडी/२०१७–१८/
मुंबई–४०००३२,
डिसेंबर २०१७

सहायक कुलसचिव
कार्यकारी प्राधिकरणे विभाग
मुंबई विद्यापीठ
फोर्ट
मुंबई– ४०० ०३२

विषय : – व्यवस्थापन परिषद ठराव. व्यवस्थापन परिषद सभा दिनांक २२ सप्टेंबर, २०१७

संदर्भ : – क्र. का. प्रा. वि./ आयसीडी/२०१७ – १८/२१९ दिनांक ४ डिसेंबर,२०१७

उपरोक्त विषयाच्या अनुंषगाने कळविण्यात येते की, व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २२ सप्टेंबर,२०१७ रोजीच्या सभेमध्ये बाब क्र. 'क' अन्वये गटविमा योजनेबाबत पारित झालेल्या ठरावाच्या अनुंषगाने या विभागामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

१. गटविमा योजना ( Group Insurance) योजना स्विकारण्याबाबत अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वैयक्तीक होकार (संमतीपत्र) कार्यालयीन परिपत्रक क्र. ईएसटी/आयसीसी/२०१७ -- १८/७, दिनांक ९ ऑगस्ट,२०१७ रोजी निर्गमित करण्यात आले.

२. विद्यापीठातर्फे कार्यान्वित असलेल्या वैद्यकीय गटविमा योजनेबाबत परिपत्रक क्र. आस्था २ (४) ईएसटी/ आयसीसी/२०१७–१८/१२, दिनांक १८ सप्टेंबर,२०१७ अन्वये लेखी स्वरूपात नकारपत्र अधिकारी/कर्मचारी यांचेकडून मागविण्याबाबत परिपत्रक निर्गमित करण्यात आले.

उपरोक्त परिपत्रक अन्वये विहीत मुदतीत ~~८३५~~ आलेले अधिकारी/कर्मचारी यांचे होकारपत्र वित्त व लेखा विभागात पत्र क्र. इएसटी/ आयसीडी/ २०१७ – १८/ ९६७, दिनांक ३१ ऑगस्ट,२०१७ व ईएसटी/ आयसीडी/२०१७ – १८/१००९, दिनांक ८ सप्टेंबर,२०१७ अन्वये जमा करण्यात आले.

~~विहीत मुदतीनंतर ६१ अधिकारी/ कर्मचारी यांचे होकारपत्र विभागात प्राप्त.~~

परिपत्रक क्र. २ अन्वये ~~७४~~ अधिकारी/कर्मचारी यांचे नकारपत्र या विभागास प्राप्त झाले.

परिपत्रक क्र. आस्था. २(४)/इएसटी/आयसीसी/२०१७–१८/१३, दिनांक २५ ऑक्टोबर,२०१७ अन्वये विद्यापीठातील शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनातून दरमहा रू. १५०/– कपात करण्याबाबत परिपत्रक निर्गमित करण्यात आले.